MHPU090037102026

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १३५/२०२६**

**निन्गाराम चिक्केगौडा व इतर ५** **अर्जदार...**

**विरुध्द**

**कोणी नाही** **जाबदेणार...**

## निशाणी ०१ खालील पारित आदेश

(पारित दि. १६/०७/२०२६)

१. अर्जदार यांनी बॉम्बे रेग्यूलेशन VIII, १८२७ नुसार कायदेशिर वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जदारांचे असे म्हणणे आहे की, अर्जदार यांचे वडील कै. नारायण नागप्पा चिक्केगौडा यांचे दि.०२/०२/२००६ रोजी निधन झाले आहे. तसेच अर्जदार यांची आई कै. निंगम्मा यांचे दि.०४/०३/२०२१ व आजी कै. लींगम्मा यांचे देखील निधन झाले आहे. कै. नारायण नागप्पा चिक्केगौडा यांस अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. शासकीय व निमशासकिय कामासाठी अर्जदार यांना ते कै. नारायण नागप्पा चिक्केगौडा यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून अर्जदार यांनी त्यांचे नावे कै. नारायण नागप्पा चिक्केगौडा यांच्या बाबतचे बॉम्बे रेग्यूलेशन VIII, १८२७ नुसार कायदेशिर वारस प्रमाणपत्र जारी करण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

३. अर्ज दाखल केल्यानंतर न्यायालयाने निशाणी १२ अन्वये

जाहीरनामा काढला व त्याच्या प्रती दिवाणी न्यायालय पिंपरी, पुणे यांचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द केल्या. तसेच दि.०८/०५/२०२६ रोजी दैनिक पुण्य नगरी आवृत्ती या वर्तमानपत्रामध्ये जाहीर प्रकटन प्रसिध्द केले व हरकती मागविल्या होत्या. परंतु जाहीर प्रकटन होऊनही अर्जदारांच्या अर्जाला कोणत्याही प्रकारे कोणतीच हरकत कोणातर्फे घेण्यात आलेली नाही.

४. अर्जदार क्र.१ यांनी दि.२५/०६/२०२६ रोजी त्यांचे सरतपासणीचे शपथपत्र सादर करुन अर्जात नमूद तथ्यकथने त्यांच्या सरतपासणीच्या शपथपत्रात सांगितलेली आहेत. अर्जदार हे त्यांच्या कथनाच्या पृष्ठ्यर्थ निशाणी ३ सोबत जोडलेला कै. नारायण नागप्पा चिक्केगौडा व कै. निंगम्मा यांचा मृत्यूदाखला इत्यादी कागदोपत्री पुराव्यांवर भिस्त ठेवीत आहे.

५. अर्जदारातर्फे सादर करणेत आलेल्या उपरोक्त तोंडी व कागदोपत्री पुराव्यातून कै. नारायण नागप्पा चिक्केगौडा यांचे अर्जदार हे हयात असलेले कायदेशीर वारस असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार यांचे वारसा हक्काबाबत जाहीर प्रकटन वर्तमानपत्रात प्रसिध्द होउनही कुठलाही आक्षेप न्यायालयात आलेला नाही. शासकीय व निमशासकिय कामासाठी अर्जदार यांस वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार यांच्या नावे बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ नुसार कायदेशिर वारस प्रमाणपत्र जारी करण्यास मला कुठलीही अडचण वाटत नाही. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार हे कै. नारायण नागप्पा चिक्केगौडा यांचे कायदेशिर वारस

असल्याबाबत मान्यता देण्यात येते.

३. कै. नारायण नागप्पा चिक्केगौडा यांचे अर्जदार हे वारस असल्याबाबत कायदेशिर वारस प्रमाणपत्र यथायोग्य न्यायालयीन शुल्क आकारुन जारी करण्यात येते.

TEJASWINI SANDEEP MAHADIK

Digitally signed by TEJASWINI SANDEEP MAHADIK
Date: 2026.07.16 17:57:21 +0530

दि. १६/०७/२०२६ ( टी.एस.महाडीक )

ठिकाण – पिंपरी. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
पिंपरी, पुणे

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of Court | : Smt. T. S. Mahadik<br>4th Jt. C.J.J.D., Pimpri, Pune |
| Name of the Steno | : Mrs. N.K.Vaidya |
| Date of order. | : 16/07/2026 |
| Order digitally signed by the Presiding Officer on. | : 16/07/2026 |
| Order uploaded on. | : 16/07/2026 |